ePaper

## मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीवर बसून पुत्राचा कारभार!



| वर्ष - 6 | अंक - 165 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत

- रस्त्यांची निकृष्ट कामे करणाऱ्या ठेकेदारांना अभय पथ विभागाच्या शिफारशीमध्ये आयुक्तांकडून बदल
- चिंचवडच्या बटरफ्लाय उड्डाणपुलाचा खर्च २५ कोटींचा आता ४० कोटींवर!
- 'उत्साहामध्ये या, शिस्तीने या...'


www.mahaenews.com | ।शनिवार ।दिनांक 24 सप्टेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# नाशिकफाटा चौकाचा श्वास कोंडलेला !

## कोट्यवधी खर्चूनही पादचाऱ्यांना करावी लागतेय तारेवरची कसरत

| पिंपरी चिंचवड |
| महाईन्यूज | प्रतिनिधी|

**पिंपरी-चिंचवड शहरातील सर्वात मोठ्या आणि दुमजली असलेल्या नाशिकफाटा (कासारवाडी) चौकातील जे.आर. डी टाटा उड्डाणपुलाचा संपूर्ण चौक अतिशय धोकादायक बनला आहे. उड्डाणपुलासाठी जवळपास १५० कोटींहून अधिक रक्कम खर्च केल्यानंतरही येथील वाहतूक कोंडीची समस्या सुटलेली नाही. प्रशस्त अशा या चौकात पादचाऱ्यांना चालणे तथा रस्ता ओलांडणे म्हणजे तारेवरची कसरत बनली आहे.**



नाशिककडे जाणाऱ्या वळणमार्गावर असलेल्या या चौकाला नाशिकफाटा म्हणून ओळखले जाते. पुणे-मुंबई महामार्गासह रेल्वे स्थानक, एसटी तसेच इतर खासगी बसचे थांबे असल्याने या चौकाला महत्त्व होते. त्यातच आता या ठिकाणी मेट्रो स्थानक झाले आहे. या चौकातील वाहतुकीचा वाढता ताण लक्षात घेऊन पिंपरी पालिकेने रेल्वेमार्ग, महामार्ग आणि नदीवरून जाणारा प्रशस्त दुमजली उड्डाणपूल या ठिकाणी बांधला. सुरुवातीला पुलाचा खर्च ९९ कोटी होता. पूल बांधून पूर्ण होईपर्यंत खर्चाचा आकडा १५० कोटींहून अधिक झाल्याचे सांगण्यात येते.

नाशिकफाटा चौकातील पूल तयार झाल्यानंतर येथील संपूर्ण रचना बदलली. विस्तारित चौकात अनेक व्यवसाय नव्याने सुरू झाले, दाटीवाटीने दुकाने थाटली गेली. या सर्व भरभराटीत रस्त्यावरून चालणाऱ्या नागरिकांचा कोणताही विचार झाला नाही. त्यामुळेच या ठिकाणी रस्त्याच्या कडेने चालणे किंवा रस्ता ओलांडणे अतिशय अवघड बनले आहे. किरकोळ अपघात होणे हे नियमित आहे. रस्त्याची दुर्दशा झालेली आहे. त्यामुळे वाहतूक मंदावलेली असते. भोसरीकडून कासारवाडीकडे जाताना वळणाच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झालेली आहेत. त्यामुळे अपघाताचा धोका संभवतो. वाहतूक पोलिसांकडून दिखावू कारवाई केली जाते. पालिकेचे पूर्वीपासूनच या चौकातील सुरक्षिततेकडे दुर्लक्ष असल्याची नागरिकांची तक्रार आहे.

### बळकावलेला रस्ता अन् यंत्रणेची डोळेझाक

नाशिकफाटा ते आमंत्रण हॉटेल (फुगेवाडी) आणि कासारवाडी ते शंकरवाडी या मार्गांवर दोन्ही बाजूला असलेल्या कार सुशोभित करणाऱ्या दुकानांचे अतिक्रमण ही मोठी डोकेदुखी बनलेली आहे. रुंदीकरणानंतर वाढलेल्या रस्त्यांवर या व्यावसायिकांनी दुकाने सुरू केली. हळूहळू त्यांनी संपूर्ण रस्त्यांवर ताबा मिळवला आहे. पालिका अधिकारी तसेच पोलिसांकडे तक्रारी होऊनही उपयोग होत नसून या अतिक्रमणांकडे 'अर्थपूर्ण' दुर्लक्ष केले जाते. नवे आयुक्त शेखर सिंह तसेच पोलीस आयुक्त अंकुश शिंदे याकडे लक्ष देतील का, असा प्रश्न स्थानिक नागरिकांकडून उपस्थित करण्यात येतो आहे.

### पुलावरचा तो मार्ग बंदच...

नाशिकफाटा उड्डाणपुलावरून पुण्याच्या दिशेने उतरण्याची मार्गिका (रॅम्प) उड्डाणपूल सुरू झाल्यापासून बंदच आहे. वाहतूक पोलीस व महापालिका यांच्यात हा मार्ग सुरू करण्याबाबत एकमत होताना दिसत नाही. यासाठी रहिवाशांची, राजकीय पक्षांची अनेक आंदोलने झाली. मात्र तो रस्ता अद्याप खुला होऊ शकला नाही.

# लम्पी विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेची जनजागृती मोहीम

## शहरात गोवंशीय प्राण्यांची संख्या 3 हजार 500, आतापर्यंत 5 लम्पी विषाणू बाधित जनावरे आढळली

| पिंपरी चिंचवड |
| महाईन्यूज | प्रतिनिधी|

पिंपरी चिंचवड शहरात गोवंशीय प्राण्यांची संख्या ३ हजार पाचशे असून आतापर्यंत ५ लम्पी विषाणू बाधित जनावरे आढळून आली आहेत. या विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महापालिकेच्या वतीने जनजागृती मोहीम राबवण्यात येणार आहे, अशी माहिती आयुक्त शेखर सिंह यांनी दिली.लम्पी विषाणू साथरोगाच्या पार्श्वभूमीवर आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली महापालिका मुख्यालयात आढावा बैठक पार पडली. या वेळी लम्पीसंदर्भातील उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला. उपायुक्त सचिन ढोले, अजय चारठाणकर, रविकिरण घोडके, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.अरुण दगडे आदी उपस्थित होते.

> **लम्पी विषाणू प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर शहरातील सर्व गोवंशीय जनावरांचे लसीकरण युद्धपातळीवर करण्यात येणार आहे. या विषाणूबाबत पशुपालकांमध्ये जनजागृती करण्यासाठी महापालिकेच्या वतीने प्रबोधनपर कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. शहरातील गोशाळा, पांजरपोळ, गोठे याठिकाणी पशुवैद्यकीय विभागामार्फत सर्वेक्षण करण्यात यावे, तसेच स्वच्छतेच्या दृष्टीने आरोग्य विभागामार्फत निर्जंतुकीकरण करण्यासाठी कीटकनाशक फवारणी करण्यात यावी, या विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी लसीकरण करण्यासाठी स्वतंत्र पथके तयार करावीत.**
>
> **- शेखर सिंह,** आयुक्त पिंपरी-चिंचवड महानगर पालिका





या विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी लसीकरण करण्यासाठी स्वतंत्र पथके तयार करावीत, असे आदेशही आयुक्तांनी बैठकीत दिले. लम्पी विषाणूंबाबत चुकीची माहिती प्रसारित केल्यास कारवाई करण्यात येईल, असा इशारा उपायुक्त सचिन ढोले यांनी दिला आहे.

शहरातील गोशाळा, पांजरपोळ, गोठे याठिकाणी पशुवैद्यकीय विभागामार्फत सर्वेक्षण करण्यात यावे, तसेच स्वच्छतेच्या दृष्टीने आरोग्य विभागामार्फत निर्जंतुकीकरण करण्यासाठी कीटकनाशक फवारणी करण्यात यावी.

## शॉर्ट न्यूज

### कर्ज मंजुरीच्या आमिषाने १०० ते १५० जणांची फसवणूक




।पुणे। महाईन्यूज ।

कर्ज मंजुरीच्या आमिषाने १२ लाख ३० हजारांची फसवणूक करुन पसार झालेल्या एका तरुणीसह साथीदाराला गुजरातमधील सूरत शहरातून अटक करण्यात आली. स्वारगेट पोलिसांनी ही कारवाई केली. आरोपींनी १०० ते १५० जणांची कर्ज मंजुरीच्या आमिषाने फसवणूक केल्याचे प्राथमिक तपासात उघडकीस आली आहे. दीपाली जितेंद्र पौनिकर (वय ३२), हेमराज जीवनलाल भावसार (वय २८ दोघे रा. सार्थक सोसायटी, सिंगनपूर, सूरत, गुजरात) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. दिपाली आणि हेमराज यांनी स्वारगेट भागातील मुकुंदनगर भागात एका इमारतीत मानधन मायक्रो फायनान्स नावाची बनावट वित्तीय संस्था सुरू केली. गुलटेकडी भागातील कष्टकरी वर्गातील अनेकांना दिपाली आणि हेमराज यांनी त्वरीत कर्ज उपलब्ध करुन देण्याची बतावणी केली होती. त्यानंतर दोघांनी कर्ज मंजुरीच्या आमिषाने पैसे उकळले होते. कर्ज मंजूर न करता दोघेजण कार्यालय बंद करुन पसार झाले.

# रस्त्यांची निकृष्ट कामे करणाऱ्या ठेकेदारांना अभय पथ विभागाच्या शिफारशीमध्ये आयुक्तांकडून बदल

## निकृष्ट कामे करणारे ठेकेदार आणि अभियंत्यांवर कडक कारवाई करण्याची पथ विभागाची शिफारस

।पुणे। महाईन्यूज ।

रस्त्यांची निकृष्ट दर्जाची कामे करणाऱ्या दहा ठेकेदारांना महापालिका आयुक्त विक्रम कुमार यांनी अभय दिल्याचे स्पष्ट झाले आहे. निकृष्ट कामे करणारे ठेकेदार आणि अभियंत्यांवर कडक कारवाई करण्याची पथ विभागाची शिफारस आयुक्तांनी बदलल्याने ठेकेदार आणि अभियंत्यांना अभय मिळाले आहे. निकृष्ट दर्जाच्या रस्त्यांमुळे यातना सहन करणाऱ्या नागरिकांबाबत आयुक्तांना कळवळा नाही. मात्र, ठेकेदारांचा पुळका असल्याचे यातून स्पष्ट झाले असून त्यासंदर्भात शहरातील स्वयंसेवी संस्थांनी आयुक्तांच्या कार्यपद्धतीवर टीका केली आहे.शहरातील रस्त्यांची



निकृष्ट दर्जाची कामे केल्याप्रकरणी दहा ठेकेदारांना एक वर्षासाठी काळ्या यादीत टाकण्याची शिफारस पथ विभागाने आयुक्तांकडे केली होती. तसेच या प्रकाराला जबाबदार असलेल्या अभियंत्यांना दहा हजार रुपये दंड आणि विभागीय चौकशी करण्याचे शिफारशीत नमूद करण्यात आले होते. मात्र त्यावर अंतिम निर्णय घेताना आयुक्तांनी शिफारशीमध्ये बदल केल्याचे पुढे आले आहे.

सजग नागरिक मंचाचे अध्यक्ष विवेक वेलणकर यांनी त्याबाबत आयुक्तांच्या कार्यपद्धतीवर टीका केली आहे. दोषी ठेकेदारांना एक वर्षासाठी काळ्या यादीत टाकण्याची शिक्षा आयुक्त विक्रम कुमार यांनी सहा महिन्यांवर आणली, तर दोषी अभियंत्याची विभागीय चौकशीची शिफारस फेटाळून त्यांना पंधरा हजार रुपये दंड आकारला आहे.

देखभाल दुरुस्ती दायित्व कालावधीत (डिफेक्ट लायबिलिटी पीरियड) रस्त्यांची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाल्याचे चित्र आहे. पथ विभागाने देखभाल दुरुस्ती दायित्व कालावधीतील रस्त्यांची यादी तयार केली होती. त्यानुसार १३९ रस्त्यांचे सर्वेक्षण करण्यात आले. ७५ ठेकेदारांना नोटीसा बजाविण्यात आल्या, तर निकृष्ट दर्जाची कामे करणाऱ्या दहा ठेकेदारांना एक वर्षासाठी काळ्या यादीत टाकण्याचे पथ विभागाने प्रस्तावित केले होते.

रस्त्यांची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था होऊन लाखो पुणेकर खड्डयांमुळे हैराण झाले आहेत. त्यामुळे जबाबदार ठेकेदारांना कायमस्वरूपी काळ्या यादीत टाकणे आवश्यक होते. कायमस्वरूपी काळ्या यादीत टाकले असते तर त्यांना पुणे महापालिकेबरोबरच अन्य कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये रस्त्यांची कामे मिळणे बंद झाले असते. मात्र ठेकेदारांचा पुळका असल्याने आयुक्तांनी शिफारशीमध्ये बदल केला आहे. सहा महिन्यानंतर हेच ठेकेदार पुन्हा पुणेकरांना खड्डयात घालतील, अशी टीका सजग नागरिक मंचाचे अध्यक्ष विवेक वेलणकर यांनी केली.

# आमदार अण्णा बनसोडे घेणार पिंपरी विधानसभा मतदार संघातील कामकाजाचा आढावा

## महापलिका आयुक्तांसोबत बैठकीचे आयोजन

पिंपरी : पिंपरी चिंचवड महापालिकेत लोकनियुक्त सदस्य यांचा कार्यकाळ संपल्यावर राज्य शासनाने १३ मार्च २०२२ रोजी प्रशासकाची नेमणूक केली होती. प्रशासकीय कारभार महापालिकेत सुरू असून ६ ते ७ महिन्यांचा कालावधी उलटून गेला आहे. या कालावधीतील प्रशासकीय कामकाजाचा आढावा घेण्यासाठी उद्या (शुक्रवार दि.२३) रोजी महापालिका आयुक्त



तथा प्रशासक शेखर सिंह यांच्यासोबत आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती आमदार बनसोडे यांनी दिली.या बैठकीत पिंपरी विधानसभा मतदारसंघातील महापालिकेमार्फत सुरू असलेल्या सार्वजनिक विकास कामांची आढावा घेण्यात येणार आहे. यामध्ये महापालिकेच्या विविध विभागातील अर्थात स्थापत्य, बीआरटीएस, उद्यान, शिक्षण, आरोग्य, वैद्यकीय, पाणीपुरवठा, पर्यावरण, नगररचना, प्रशासन, माहिती तंत्रज्ञान, विद्युत, कर संकलन, एलबीटी, बांधकाम परवानगी, आकाश चिन्ह,लेखा व लेखापरीक्षण विभाग, समाज विकास, भांडार विभाग, नागरी सुविधा केंद्र, सुरक्षा, वाहतूक यासह महापालिकेच्या अधिनस्त विविध विभागांच्या कामकाजाचा आढावा या बैठकीत घेणार असल्याचे आमदार बनसोडे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

# बेशिस्त पीएमपीएल चालकांमुळे कात्रज चौकाला कोंडीचा फास!

## कात्रज चौकातील भाजी मंडई व परिसरात वाहतूककोंडी होते.

।कात्रज ।महाईन्यूज

कात्रज चौकात वाहतूक कोंडी ही नित्याचीच बाब झाली आहे. मात्र, यामध्ये पीएपीएलच्या बेजबाबदार वानचालकांमुळे भर पडत आहे. चौकात होणाऱ्या कोंडीमुळे पीएमपीएमएल आगाराकडून येणाऱ्या बसेसना गुजरवाडी बस स्थानकावरून वळवून कात्रज बसथांब्यावर आणण्याचा आदेश आहे. मात्र, पीएमपीएमएल चालकांकडून सर्रासपणे याला केराची टोपली दाखवण्यात येत आहे. पीएमपीएमएल वाहतूक विभागांकडून लावण्यात आलेले बॅरिकेट्स काढून अंतर वाचविण्यासाठी चौकातच बसेस



वळवल्या जातात. त्यामुळे कात्रज चौकातील भाजी मंडई व परिसरात वाहतूककोंडी होते.

पीएमपीएमएल चालकांच्या नियम धुडकावण्याने दोन्ही बाजूने वाहनांच्या रांगा लागतात. कात्रज चौकात रिक्षा, बसदेखील थांबत असतात त्यामुळे प्रवासी मोठ्या प्रमाणात या चौकात गर्दी करतात. त्याचबरोबर, उजवीकडे बसेस व अवजड वाहनांना वळण्यास बंदी असताना त्याचेही पालन होताना दिसत नाही. परिणामी मोठ्या प्रमाणांवर वाहतूक कोंडी होते आणि दोनशे मीटर अंतर पार करण्यासाठी वाहनचालकांना अर्ध्या तासापेक्षा जास्त कालावधी मोजावा लागतो. कोंढवा रस्ता, सातारा रस्ता, नवले पूल आणि पुणे शहरातून एकाच वेळी येणाऱ्या वाहनांमुळे प्रचंड वाहतूक कोंडी होते. यामध्ये सकाळी आणि संध्याकाळच्यावेळी अधिकची भर पडते. भारती विद्यापीठ पोलिसांकडून वाहतूक कोंडी फोडण्यासाठी प्रयत्न करण्यात येत असले तरी त्याला यश येत नसल्याचे स्पष्ट दिसून येते. याबाबत वाहतूक पोलिस आणि पीएमपीएलमध्ये समन्वय नसल्याचे दिसून येते.

> पीएमपीएलच्या नियंत्रकांकडे याबाबत सातत्याने तक्रार केली आहे. मात्र, पीएमपीएलचे चालक ऐकत नाहीत. या तक्रारीबाबत पीएमपीएलचे मुख्य वाहतूक व्यवस्थापक यांच्याशी संपर्क करुन तक्रारही केली आहे. मात्र, कोणतीही कारवाई करण्यात आल्याचे दिसून येत नाही. आमचे कर्मचारी त्याठिकाणी नसले की चालक थेट बॅरिगेट्स काढून गाडी वळविण्याचा पराक्रमदेखिल करतात.
> - दादासाहेब चुडप्पा, पोलिस निरिक्षक, वाहतूक भारती विद्यापीठ

> आम्ही सर्व बसेस गुजरवाडी फाट्यावरून वळविण्याचे नियोजन केले आहे. याबाबत वाहतूक पोलिसांना आणि आमच्या कात्रज आगाराच्या अधिकाऱ्यांना याबाबत पत्र दिलेले आहे. त्यामुळे आता पीएपीएलच्या चालकांकडून असा प्रकार घडणार नाही.
> - दत्तात्रेय झेंडे, मुख्य वाहतूक व्यवस्थापक, पीएमपीएल

> पीएमपील चालकांना कुठलाही नियम नाही. ते कुणाला जुमानत नाहीत. सिग्नल तर कधीच पाळताना दिसत नाहीत. पीएमपीएल चालकांच्या मुजोरपणामुळे कात्रज चौकातील वाहतुकीचा वारंवार बोजवारा वाजत आहे. यासाठी कात्रज चौकातून उजवीकडे वळण्यास बसेसना बंदी घालण्याची आवश्यकता आहे.
> - योगेश खैरे, स्थानिक नागरिक

# चिंचवडच्या बटरफ्लाय उड्डाणपुलाचा खर्च 25 कोटींचा आता 40 कोटींवर!

## भाजपा नेत्याशी संबंधीत कंपनीकडे काम असल्याने संशय बळावला, वाढिव खर्चावर राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेनेची चुप्पी

**पिंपरी चिंचवड ।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**



**पिंपरी चिंचवड महापालिकेतील विविध प्रकल्पांचे खर्च मूळ निविदा रकमच्या दामदुप्पट होत असल्याने नागरिकांमध्ये संभ्रम आहे. प्राधिकरणातील नियोजित ग.दि.माडगूळकर नाट्यगृहाचा खर्च २३ कोटींचा आता सुमारे ७३ कोटींपर्यंत वाढला असून असेच दुसरे उदाहरण आता समोर आले आहे. पवना नदीवर थेरगाव येथील प्रसुनधाम शेजारी १८ मीटर विकास आराखड्यातील रस्त्यावर थेरगाव – चिंचवड बटरफ्लाय पुल बांधण्यात येत आहे. या पुलाच्या उंचीत वाढ करावी लागल्याने मुळ कामाच्या परिमाणात वाढ झाली.**

त्यामुळे मुळ निविदा रकमेमध्ये पुलाचे काम पूर्ण करणे शक्य होत नाही. ही बाब लक्षात घेऊन पुलाचे काम पूर्ण होण्यासाठी उर्वरीत सबग्रेडचे काम, डांबरीकरण, काम करण्याकरिता १४ कोटी ४८ लाख रूपये खर्चाचे नवीन अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. त्यानुसार, हे काम सन २०२२-२३ च्या मुळ अंदाजपत्रकात समाविष्ट करून प्रशासकीय मान्यता घेण्यात येणार आहे. पूल पूर्ण होईपर्यंत हा खर्च आणखी काही कोटींना वाढण्याची शक्यता आहे. दरम्यान, हे काम एका भाजपा नेत्याशी संबंधीत कंपनीकडे असून शहर राष्ट्रवादी काँग्रेस तसेच उध्दव ठाकरे यांची शिवसेना त्यावर काहीच भाष्य करत नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

वाहतुकीच्या दृष्टीने पुलाचे काम करण्यासाठी महापालिका आयुक्तांनी १३ जून २०२२ रोजी बैठक घेतली होती. त्यात बटरफ्लाय पुलाच्या कामातील उर्वरीत कामे करण्यासाठी स्वतंत्र निविदा कार्यवाही करण्यात यावी, अशा सुचना देण्यात आल्या. त्यानंतर २२ जुलै २०२२ रोजी या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. बटरफ्लाय पुलाच्या सद्यस्थितीतील कामांच्या अनुषंगाने थेरगाव बाजूकडील पोहोच रस्त्यास वॉल बांधणे, मुरूम भराव करणे, रस्त्याचे सबग्रेडचे काम, डांबरीकरण, क्रॅश बरियर तसेच चिंचवड बाजूकडील रस्त्याचे सबग्रेडचे काम, डांबरीकरण, क्रॅश बरियर आणि दिशादर्शक फलक अशी उर्वरीत कामे पुर्ण करण्यात येणार आहेत. या बाबींचा समावेश अंदाजपत्रकात करण्यात येणार आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०२१-२२ च्या मंजुर दरसुचीनुसार आणि महापालिकेच्या मंजूर दरपृथ्थकरण यानुसार, प्रकल्पाचे सल्लागार श्रीखंडे कन्सल्टंट यांच्यामार्फत अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम १४ कोटी ४८ लाख रूपये इतकी येत आहे. सद्यस्थितीत चालू असलेल्या पुलाचा वापर होण्यासाठी उर्वरीत कामे करणे आवश्यक आहे. त्याकरिता हे काम महापालिकेच्या सन २०२२-२३ च्या मुळ अंदाजपत्रकात 'विशेष योजना' या लेखाशिर्षाअंतर्गत समाविष्ट करून प्रशासकीय मान्यता घेण्यात येणार आहे.

### प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक

या कामास ३१ ऑक्टोबर २०२२ पर्यंत मुदतवाढ घेण्यात आली आहे. या कामात मुख्य पुलाचे काम तसेच पोहोच रस्त्याचे काम यांचा अंतर्भाव करण्यात आला होता. तथापि, या कामासाठी जलसंपदा विभागाच्या तरतुदीनुसार, पुलाच्या उंचीचे नियोजन करून मुख्य पुलाचे डिझाईन करण्यात आले. या डिझाईननुसार, पुलाच्या उंचीत वाढ करावी लागली. त्यामुळे मुळ कामाच्या परिमाणात वाढ झाल्याने मुळ निविदा रकमेमध्ये पुलाचे काम पूर्ण करणे शक्य होत नाही. पुलाचे काम पूर्ण होण्यासाठी उर्वरीत काम करण्याकरिता नवीन अंदाजपत्रक तयार करून काम करणे आवश्यक आहे. त्यासाठी या कामाचा महापालिकेच्या सन २०२२-२३ च्या मुळ अंदाजपत्रकात समावेश करून प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे.

### 18 मीटर विकास आराखड्यातील रस्त्यावर उभारला जातोय पूल

थेरगाव येथील प्रसुनधाम हौसिंग सोसायटी शेजारी १८ मीटर विकास आराखड्यातील रस्त्यावर थेरगाव – चिंचवड हा बटरफ्लाय पुल बांधण्यात येत आहे. हा पुल धनेश्वर पुलाशेजारी होत असून या पुलाचा समावेश महापालिका विकास आराखड्यामध्ये झालेला आहे. नव्याने थेरगाव – चिंचवड पुल केल्यास बिर्ला रूग्णालयाशेजारील पुलावरील वाहतुक बऱ्याच अंशी कमी होणार आहे. या पुलाचा उपयोग हिजवडी, ताथवडे, पुनावळे तसेच पुण्याकडील भागांना चिंचवड, पिंपरीगाव या परिसरात जाण्यासाठी जास्त प्रमाणात होणार आहे. त्यामुळे या पुलाचे बांधकाम करणे आवश्यक आहे. नव्याने करण्यात येणाऱ्या पुलाच्या दोन्ही बाजुपैकी थेरगाव भागाकडील साधारणत: ९० टक्के जागा महापालिकेच्या ताब्यात आहे. तसेच चिंचवडकडील जागाही ताब्यात आहे. या पुलाचे बांधकाम करण्यासाठी महापालिकेतर्फे सन २०१७ मध्ये निविदा मागविण्यात आल्या होत्या. निविदा खर्च २५ कोटी १९ लाख रूपये अपेक्षित धरण्यात आला. त्यानुसार, तीन ठेकेदारांनी निविदा सादर केल्या. त्यामध्ये धनेश्वर कन्स्ट्रक्शन यांनी १४ टक्के म्हणजेच २८ कोटी ७१ लाख रूपये असा जादा दर सादर केला. इतर दोन ठेकेदारांपेक्षा त्यांचा दर कमी असल्याने त्यांना या पुलाचे बांधकाम देण्यात आले.

---



# चिखलीत रिक्षांच्या सौंदर्य स्पर्धा!

## टाळगाव चिखली येथे येत्या 28 सप्टेंबरला रिक्षांच्या सौंदर्य स्पर्धांचे आयोजन

**पिंपरी।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**टाळगाव चिखली येथे येत्या २८ सप्टेंबरला रिक्षांच्या सौंदर्य स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी आकर्षक बक्षिसे जाहीर करण्यात आली आहेत. पूर्वाश्रमीचे रिक्षाचालक असलेले माजी महापौर राहुल जाधव यांनी या स्पर्धांचे आयोजन केले आहे.**

चिखली जाधववाडी येथील रामायण मैदानात २८ सप्टेंबरला दुपारी तीन वाजता या स्पर्धा होणार आहेत. राहुल जाधव स्पोर्टस फाऊंडेशन या संस्थेच्या वतीने या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेतील पहिल्या क्रमांकासाठी २१ हजार हजार रुपये, दुसऱ्या क्रमांकासाठी १५ हजार रुपये, तिसऱ्या क्रमांकासाठी ११ हजार रुपये बक्षीस ठेवण्यात आले आहे. चिखली भागातील रिक्षाचालकांसाठी या स्पर्धा मर्यादित असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले आहे.

## संपादकीय »

# ‘जाग्या त्याथी सवार’

***व्यक्तीप्रमाणेच एखाद्या राज्याच्या वाट्यालाही असा एखादा अनुभवाचा दणका बसतो, की त्याने जबर हानी होतेच; परंतु त्याबाबत मुळापासून काही बोध घेतला तर दूरगामी सकारात्मक परिणामही होतात. ‘वेदान्त-फॉक्सकॉन’ हा सेमीकंडक्टर उत्पादनाचा मोठा प्रकल्प महाराष्ट्राऐवजी गुजरातेत गेल्याने उद्योग आणि त्यासाठीची गुंतवणूक याबाबत महाराष्ट्र खडबडून जागा झाल्याचे जे चित्र निर्माण झाले आहे, ते वाईटातून चांगले घडण्याची निदान आशा निर्माण करणारे आहे.***

गुजरातीतील ‘जाग्या त्याथी सवार’ या म्हणीप्रमाणे ‘जाग येईल तीच सकाळ’ समजून पुढे जात राहणे आवश्यक आहे. सार्वजनिक धोरणाशी संबंधित अनेक बाबी सर्वसामान्य लोकांसमोर येतात, त्या राजकीय चर्चेतूनच.

गेल्या वर्ष-दोन वर्षांतील आपल्याकडच्या राजकीय चर्चेचे विषय पाहिले तर अस्मिताबाजीचे झेंडे नाचवणे, आरोप-प्रत्यारोपांची धुळवड, इतिहासातल्या वादांवर खडाजंगी करणे आणि भरमसाठ दावे करणे असे त्याचे स्वरूप होते. ‘फॉक्सकॉन वेदान्त’च्या झटक्याने आपल्याला खाडकन वर्तमानकाळात आणून ठेवले आहे. राज्यातील प्रत्येक पक्ष आणि नेता उद्योग गेला म्हणून हळहळतो आहे. गुंतवणूक आली पाहिजे, उद्योग उभे राहिले पाहिजेत, याच बाजूने बोलत आहे. उद्योग राज्यात यायचे असतील तर भांडवल लागते. मग ते परकी आहे की स्वदेशी आहे, त्याचा रंग कोणता असा खल कोणी करीत नाही. परकी कंपन्यांना साम्राज्यवादाचे, अमेरिका व अन्य भांडवलशाही राष्ट्रांचे हस्तक ठरवत नाही. हा बदल लक्षात घेण्याजोगा. दुसरी सकारात्मक बाब म्हणजे राज्याच्या औद्योगिक प्रगतीसाठी पूर्वपुण्याईवर भिस्त ठेवण्याचे दिवस गेले, याचेही भान या घटनेने महाराष्ट्रातील राजकारण्यांना आणून दिले आहे. आर्थिक उदारीकरणाला तीन दशके उलटून गेली असली तरी ती प्रक्रिया ऐन भरात आल्याचा हा काळ आहे.

पूर्वी ठराविक राज्येच आर्थिक, औद्योगिक प्रगतीबाबत, गुंतवणूक आणण्याबाबत सजग होती. आता जवळजवळ सर्वच राज्ये या स्पर्धेत आहेत. त्यामुळे ‘तू तू-मैं मैं’च्या धुळवडीतून बाहेर पडून राज्यातले वातावरण उद्योगानुकूल कसे होईल, शासकीय निर्णयप्रक्रिया वेगवान कशी होईल, लाल फीत कशी कमी करता येईल, अशा गोष्टींवर लक्ष केंद्रित करावे लागेल. कोणते राज्य सवलती किती देते, हा विषय जसा उद्योगपतींच्या अजेंड्यावर असतो,त्याइतकाच कायदेकानूंची चौकट, करांची आकारणी, कायदा-सुव्यवस्था आणि राजकीय स्थिरता यासारखे मुद्देही त्यांच्या डोळ्यासमोर असतात. या सर्व बाबतीत राज्याला लक्ष केंद्रित करावे लागेल. महाराष्ट्र हे ‘गुंतवणुकीसाठीचे आकर्षक स्थान" बनवावे लागेल.



## आनंदी सकाळ

# चैतन्य साऱ्या सजीवांत व निर्जीवांत असतेच

दुसरे मन फक्त तुमचे हित कशात आहे ते पाहूनच निर्णय घेते. तो अंतरात्मा. या अंतरात्म्याच्या अनुसंधानातच आपण राहिले पाहिजे; जेणेकरून आपली जाणीव विरल होत जाऊन त्या विश्वात्म्याशी, विश्वाच्या चालक शक्तीशी आपले अनुसंधान राहते. 'मी' आहे, ही जाणीव मला आहे, माझ्या मुलीला आहे, माझ्या आईलाही आहे. 'मी' आहे, ही जाणीव माणसाच्या जन्मापासून आहे. देह बदलतील; पण जाणीव असतेच. या अर्थाने ती अमर आहे. जळणे, तुटणे, फुटणे इत्यादी विकार देहाला होतात; जाणिवेला नाही. ती सूक्ष्म आहे. ती आहे हे आपल्याला कळते; कारण तिच्या अस्तित्वामुळेच आपल्याला 'मी'चे भान असते. या जाणिवेने, चैतन्याने सारे ओतप्रोत भरलेले आहे. सजीवांत, म्हणजे प्राणिमात्रांत किंवा फळाफुलांत चैतन्य आहे. ते आपल्याला दिसते किंवा भासते. ज्या गोष्टी जड आहेत, उदा. लाकूड, कागद, लोखंड इत्यादींतही हे चैतन्य असतेच.

# महागाई आटोक्यात कशी आणणार?





## भूमिका

महागाईचा लोकांवर परिणाम थेटच दाखवणारा ‘ग्राहक किंमत निर्देशांक’ गेल्या ऑगस्टमध्ये सात टक्क्यांवर आला आहे आणि घाऊक किंमत निर्देशांक १२.४ टक्क्यांवर येत आहे. हे आकडे आधीच्या काही आकडय़ांपेक्षा कमी आहेत. तरीदेखील यातून एक बाब स्पष्ट होते ती अशी की, महागाई व्यवस्थापनाच्या बाबतीत भारताची कामगिरी समाधानकारक नाही. जर सप्टेंबरची चलनवाढ ६ टक्क्यांच्या वर- म्हणजे रिझव्‍‌र्ह बँकेने ठरवलेल्या ‘सह्य पातळी’पेक्षा जास्त- राहिली तर असे का घडते आहे याचे स्पष्टीकरण केंद्र सरकारला आणि देशाला देण्याची जबाबदारी या मध्यवर्ती बँकेवर, विशेषत: तिच्या चलनविषयक धोरण समितीच्या (मॉनेटरी पॉलिसी कमिटी – एमपीसी) सदस्यांवर असेल. सलग तीन तिमाहींत महागाई दर सहा टक्क्यांच्या वर असू नये, असे बंधन २०१६ च्या महागाई लक्ष्य धोरणानुसार आपण स्वीकारलेले आहे. अखेर हा, रिझव्‍‌र्ह बँक व ‘एमपीसी’ सदस्यांच्या विश्वासार्हतेचाही प्रश्न आहे.

मात्र आजची परिस्थिती अभूतपूर्व आहे, हे साऱ्यांनीच मान्य केले पाहिजे. प्रथम कोविड-१९ चा तडाखा जगभर बसला, त्यानंतर रशिया-युक्रेन संघर्ष सुरू झाला आणि आता हवामान बदल (उष्णतेची लाट) जागतिक वस्तूंच्या किमतींवर परिणाम करत आहे. जगातील इतर प्रमुख देशांच्या संदर्भात भारताची कामगिरी पाहणे तर्कसंगत ठरेल. अमेरिका आणि बहुतेक युरोपीय देशांमध्ये महागाई थोडी जास्त आहे (आठ ते १२ टक्के) आणि सकल राष्ट्रीय उत्पन्नातील (जीडीपी) वाढ खूपच कमी असण्याची शक्यता आहे, त्या तुलनेत भारताने बऱ्यापैकी कामगिरी केली आहे. तुर्कस्तानसारख्या देशांपेक्षा भारताची स्थिती निश्चितच चांगली आहे. तिथे जुलैमध्ये महागाई ८० टक्के होती. आपले शेजारी-पाकिस्तान (महागाई २७ टक्के) आणि श्रीलंका (६४ टक्के) यांच्याशी आपली तुलनाच नको. देशांतर्गत तुलना करायची तर यूपीए म्हणजे संयुक्त पुरोगामी आघाडीच्या कालावधीत (२००४-०५ ते २०१३-१४) महागाई सरासरी ७.९ टक्के होती आणि जीडीपी वाढ सरासरी ७.७ टक्के होती, तर एनडीए- राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या कालावधीत (२०१४-१५ ते २०२२-२३) सरासरी ५.१ टक्के महागाई ही चांगली कामगिरी, परंतु याच काळात सरासरी ‘जीडीपी’वाढ ५.६ टक्के ही खराब कामगिरी ठरते.

# ‘चंदेरी’ सुवर्णकाळाचा दस्तावेज

**कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भ या चारही हवामान विभागांत फारसा पाऊस झाला नाही. काही ठिकाणी दोन-चार सरी आल्या, काही ठिकाणी तुरळक पाऊस झाला**

भारतात हिंदी चित्रपटांच्या वाटचालीतील महत्त्वाचा प्रवाह प्रादेशिक चित्रपटांची लेखकाने नोंद घेतली आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर चर्चा झालेला ‘संत तुकाराम’ राष्ट्रीय पुरस्कार मिळविणारा ‘श्यामची आई’ या चित्रपटांपासून या संपन्न परंपरेचा धांडोळा घेताना कन्नड, बंगाली आणि मल्याळम अशा विविध भाषांमधील चित्रपटांच्या योगदानाचाही परामर्ष त्यांनी घेतला आहे.

स्वातंत्र्यलढ्यानंतर देशउभारणीच्या काळात सर्व स्तरांवर होणाऱ्या घुसळणीतून समोर आलेला सशक्त आशय, नव्याने विकसित होत असलेले तंत्रज्ञान आणि गीत-संगीतातील वेगवेगळे प्रयोग, अशा विविध कसोट्यांवर साठचे दशक भारतीय चित्रपटसृष्टीतील सुवर्णकाळ मानले जाते. या काळातील चित्रपटांमध्ये देशातील बदलते प्रवाह आणि राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक परिस्थितीचे प्रतिबिंब उमटले. ज्येष्ठ अभ्यासक सुकुमार शिदोरे यांनी आपल्या ‘सिनेमा सिनेमा माय सिक्स्टीज’ या पुस्तकामध्ये हा संपूर्ण पट शब्दबद्ध केला आहे.



प्रामुख्याने आंतरराष्ट्रीय चित्रपट, हिंदीसह विविध प्रादेशिक भाषांतील भारतीय चित्रपट, मराठी चित्रपट आणि चित्रपटसृष्टीशी संबंधित घडामोडी अशी या पुस्तकातील विषयांची मांडणी आहे. युरोपीय चित्रपटांवर यामध्ये काही लेख आहेत; तसेच ‘आशीर्वाद’, ‘सत्यकाम’, ‘भुवन शोम’, ‘मुझे जीने दो’, ‘उंबरठा’, ‘साधी माणसं’ अशा मैलाचा दगड मानल्या गेलेल्या चित्रपटांवर स्वतंत्र लेख यामध्ये आहेत. या चित्रपटांचा आशय, कथानकाची हाताळणी, नवे प्रयोग, अभिनय आणि गीत-संगीत अशा विविध विषयांची चर्चा त्यात करण्यात आली आहे.

यामध्ये एकात्मता जोपासणाऱ्या चित्रपटांची स्वतंत्र प्रकरणात चर्चा केली आहे. त्यामध्ये ‘पडोसी’ चित्रपटाचे योगदान टाळता येणार नाही. मानवी भावनेची तार कलात्मक पद्धतीने छेडणे, हे चित्रपटांचे वैशिष्ट्य लेखकाने ‘बायसिकल थीफ’, ‘अपू त्रिचित्रधारा’ (ट्रायलॉजी) या उदाहरणांसह मांडले आहे. मानवी मूल्यांना प्रामाणिकपणे केलेले आवाहन हे देश-भाषांच्या मर्यादा ओलांडून रसिकांच्या मनाला भिडते आणि अशा कलाकृती राष्ट्रांच्या पलीकडे वैश्विक एकात्मताही जपतात, असे निरीक्षण त्यांनी नोंदविले आहे.

भारतीय चित्रपटांतील वास्तववाद; तसेच व्यावसायिक आणि वास्तववादी अशी चित्रपटांची विभागणी यावर शिदोरे यांनी अनेक उदाहरणांसह भाष्य केले आहे. चित्रपटसृष्टीने या संकल्पनांचा जो अर्थ स्वीकारला, त्याच्या पलीकडे जाऊन आणखी मोठा पल्ला गाठण्याचे परखड मत त्यांनी व्यक्त केले आहे.

ज्येष्ठ चित्रकर्मी ख्वाजा अहमद अब्बास यांच्यावरील ‘ॲन अँग्री फिल्ममेकर’ हे प्रकरण उल्लेखनीय आहे. त्यांच्या चित्रपटांचा धांडोळा घेऊन ‘न्यायावर आधारित समाजाची निर्मिती केल्याशिवाय आपल्याला महासत्ता म्हणून मिरवता येणार नाही,’ हा स्पष्ट निष्कर्ष त्यांनी मांडला आहे.

## ।। अभंगवाणी ।।



सावध जालों सावध जालों ।
हरिच्या आलों जागरणा ॥१॥
तेथें वैष्णवांचे भार ।
जयजयकार गर्जतसे ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)


# ‘उत्साहामध्ये या, शिस्तीने या...’

## दसरा मेळाव्याच्या परवानगीनंतर उद्धव ठाकरेंचे शिवसैनिकांना आवाहन

। मुंबई । महाईन्यूज ।

**‘उत्साहामध्ये या, वाजत-गाजत या, शिस्तीने या कुठेही आपल्या तेजस्वी परंपरेला गाळबोट लागेल असे कृत्य करू नका’, असे आवाहन शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शिवसैनिकांना केले आहे. मुंबई उच्च न्यायालयाने दुपारी शिवाजी पार्कातील दसरा मेळाव्याबाबत झालेल्या सुनावणीवेळी शिवसेनेला परवानगी दिली.**

मात्र, ही परवानगी देण्यापूर्वी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही, याबाबत शिवसेनेच्या



वकिलांकडे विचारणा केली. त्यावेळी त्यांनी ‘आम्ही असे कोणतेच कृत्य करणार नाही’, असे आश्वासन न्यायालयाला दिले.

मुंबई उच्च न्यायालयाने शिवाजी पार्कातील दसरा मेळाव्याला परवानगी दिल्यानंतर मुंबईसह राज्यभरात जल्लोष साजरा करण्यात आला.

### न्यायदेवतेवरचा विश्वास सार्थ ठरला

मुंबई उच्च न्यायालयाने शिवाजी पार्कातील दसरा मेळाव्याला परवानगी दिल्यानंतर मुंबईसह राज्यभरात जल्लोष साजरा करण्यात आला. याच पार्श्वभूमीवर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. त्यावेळी “गेल्या 66 सालापासून विजयादशमीच्या दिवशी आमचा मेळावा होतो. या दसरा मेळाव्याच्या परवानगीबाबतच्या केसमध्ये शिवसेनेला विजय मिळाला आहे. आमचा न्यायदेवतेवरचा विश्वास सार्थ ठरला आहे”, असे उद्धव ठाकरे यांनी म्हटले. तसेच, “न्यायदेवतेने आमच्यावर जो विश्वास टाकलेला आहे, त्याबाबत शिवसैनिकांना मी आवाहन करतो की, त्यांनी उत्साहामध्ये या, वाजत-गाजत या, शिस्तीने या कुठेही आपल्या तेजस्वी परंपरेला गाळबोट लागेल असे कृत्य करू नका”, असेही त्यांनी म्हटले.

याच पार्श्वभूमीवर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. त्यावेळी “गेल्या 66 सालापासून विजयादशमीच्या दिवशी आमचा मेळावा होतो. या दसरा मेळाव्याच्या परवानगीबाबतच्या केसमध्ये शिवसेनेला विजय मिळाला आहे. आमचा न्यायदेवतेवरचा विश्वास सार्थ ठरला आहे”, असे उद्धव ठाकरे यांनी म्हटले. तसेच, “न्यायदेवतेने आमच्यावर जो विश्वास टाकलेला आहे, त्याबाबत शिवसैनिकांना मी आवाहन करतो की, त्यांनी उत्साहामध्ये या, वाजत-गाजत या, शिस्तीने या कुठेही आपल्या तेजस्वी परंपरेला गाळबोट लागेल असे कृत्य करू नका”, असेही त्यांनी म्हटले. “आपल्या तेजाच्या वारश्याला गालबोट लागेल, असे होऊ देऊ नका. कारण इतर काय करतील, त्यांची मला कल्पना नाही. पण आपली परंपरा आहे. आपल्या महाराष्ट्राच्या छत्रपती शिवाजी महाराजांच्ये प्रतिनिधीत्व करत आहोत. या दसरा मेळाव्याकडे केवळ महाराष्ट्रातच नवे तर, देशासह जगभरातील बांधव याकडे पाहत आहेत. आजच्या न्यायालयाच्या निकालाकडेही त्यांचे लक्ष होते”, असे उद्धव ठाकरे यांनी सांगितले.

“आमची शिवसेना वाढलेली आहे. परवा आमचा मुंबईतील शिवसेनेच्या गटप्रमुखांचा मेळावा होता, त्यावेळी बरेचजण तिथे उपस्थित होते. कायदा आणि सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी न्यायालयाने राज्य सरकारवर टाकलेली आहे. त्याच्यामुळे राज्य सरकारसुद्धा याला जबाबदार राहणार आहे. त्यामुळे राज्य सरकार त्यांचे योग्य काम करेल”, असे उद्धव ठाकरे यांनी कायदा आणि सुव्यवस्थेबाबत सांगितले.

# कठीण काळातील एक आगळावेगळा अनुभव -‘जॉय ऑफ गिव्हिंग’!

## लॉकडाऊन काळापासून 2 वर्षांत सुमारे 5 ते 6 हजार गोरगरीब, वंचित व गरजूना वाटप केले किराणा किट

।मुंबई । ।महाईन्यूज।

खडतर काळात जो उभा राहतो तो आपला, हा अनुभव अनेकांना येत असतो. कोरोना काळात याचा अनुभव प्रकर्षाने आला. या महामारीच्या काळात अनेक सामाजिक कार्यकर्ते आणि संस्था अडलेल्या-नाडलेल्यांच्या मदतीसाठी धावून आल्या. त्यापैकीच एक म्हणजे ‘जॉय ऑफ गिव्हिंग’ ही संस्था.चीनमधून इतर देशात कोरोनाचा फैलाव झाला. 2020मध्ये त्याने भारतात शिरकाव केल्यानंतर ना भूतो ना भविष्यती अशी परिस्थिती उद्भवली. लॉकडाऊनमुळे संपूर्ण देशाचा कारभार ठप्प झाला होता. लोक भीतीच्या सावटाखाली होती. म्हणूनच आप्त-स्वकीय, शेजारपाजारचे लोकही मदतीला पुढे येत नव्हते. अनेकांच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला होता. ज्यांचे हातावर पोट आहे, त्यांचे तर हाल सुरू झाले. टीचभर पोटाची खळगी भरण्यासाठी भाकरीचा चंद्र प्रत्येकालाच हवा होता. अशा परिस्थितीत सामाजिक बांधिलकी जपत ‘जॉय ऑफ गिव्हिंग’सारख्या

या संस्थेने 2021-22मध्ये विविध स्पर्धांचे आयोजन केले होते. त्याचा बक्षीस वितरण समारंभ नुकताच झाला. यावेळी समाजात चांगले काम करणाऱ्या संस्थाना विशेष पुरस्कार आणि महिलांना नारीशक्ती पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. ‘समाजातील सर्व घटकांपर्यंत आनंद व समाधान पोहोचवायचे असेल तर, तरुणाईने पुढाकार घेऊन जागोजागी अशा प्रकारचे सामाजिक बांधिलकी जोपासणारे सोशल ग्रुप तयार होणे गरजेचे असल्याचे संस्थेचे संस्थापक हिरवे सर सांगतात. अलीकडेच अनेक गरजू शाळांना साधारण 25 पंखे आणि भांडुप येथील केणी विद्यालयातील वंचित 225 विद्यार्थ्यांना किराणा किट व शैक्षणिक साहित्य देऊन सहकार्य करण्यात आले.



संस्था पुढे सरसावल्या.

लॉकडाऊन काळापासून दोन वर्षांत जवळपास सुमारे पाच ते सहा हजार गोरगरीब, वंचित व गरजू कुटुंबांना किराणा किट देण्याच काम संस्थेतर्फे करण्यात आले व अजूनही हे काम नियमितपणे सुरू आहे. कोणताही स्वार्थ व प्रसिद्धीची अपेक्षा न बाळगता समाज माध्यमावरील या ग्रुपचे सदस्य सढळ हस्ते आर्थिक व वस्तूरुपी योगदान देऊन संस्थेचा प्रत्येक उपक्रम यशस्वी करत असतात.

जोगेश्वरीचे आदर्श शिक्षक पुरस्कारप्राप्त गणेश हिरवे यांनी ‘जॉय ऑफ गिव्हिंग’ हा ग्रुप तयार केला. गणेश हिरवे यांनी समाजकार्याचा वसा घेतला आहे. हिरवे यांनी करोना काळात पाच वेळा आणि आतापर्यंत एकूण 35 वेळा रक्तदान केले आहे. या समाजसेवेचे व्रत आणखी व्यापक करण्याच्या दृष्टीने आपले सोबती व समाजातील सधन-गुणी व्यक्तींची साथ घेण्याचे त्यांनी प्रयत्न केले. मुंबईसह महाराष्ट्रभरात या ग्रुपचे सभासद पसरले आहेत. कार्याबहुल्यात अधिक वेळ त्यासाठी देता येत नसल्याने व्हॉट्सअपच्या माध्यमातून या ग्रुपचे सर्व सदस्य एकमेकाना जोडले गेले आहेत. सर्वाना सोयीचा दिवस साधून हे सदस्य सातत्याने विविध ग्रामीण व आदिवासी भागात दौरे करतात व तेथील गरजू लोकांना, वृद्धांना, अनाथांना, विद्यार्थ्यांना विविध गरजेच्या वस्तूंची मदत करतात. आजवर या ग्रुपने अनेक लोकोपयोगी उपक्रम विविध भागांत राबवलेले आहेत.

या संस्थेने 2021-22मध्ये विविध स्पर्धांचे आयोजन केले होते.

# मुंबईतील रिक्षा-टॅक्सी चालकांचा संप मागे

## 1 ऑक्टोबरपासून होणार भाडेवाढ!



।मुंबई ।महाईन्यूज।

सीएनजीच्या दरात झालेली वाढ लक्षात घेता खटुआ समितीच्या शिफारशीनुसार भाडेवाढ मिळावी, या मागणीसाठी रिक्षा-टॅक्सी चालक २६ सप्टेंबरपासून बेमुदत संपावर जाणार होते. मात्र, उद्योगमंत्री उदय सामंत यांच्यासोबत झालेल्या बैठकीतनंतर हा संप तत्वत: मागे घेत असल्याचं मुंबई टॅक्सी मेन्स युनियनने स्पष्ट केलं आहे.

सीएनजीच्या दरात वाढ झाल्याने मुंबईतील रिक्षा – टॅक्सी चालक १५ सप्टेंबरपासून संपावर जाणार होते. पण, १३ सप्टेंबर रोजी उदय सामंत यांची मुंबई टॅक्सी मेन्स युनियनसमवेत बैठक झाली आणि संप मागे घेतला. मात्र, बैठकीत शब्द न पाळल्याचा आरोप करत मुंबईतील रिक्षा-टॅक्सी चालकांनी पुन्हा एकदा २६ सप्टेंबरपासून हा बेमुदत संपावर जाणार असल्याचं जाहीर केलं. त्याच पार्श्वभूमीवर आज (२३ सप्टेंबर) उदय सामंत यांची मुंबई टॅक्सी मेन्स युनियनसह बैठक पार पडली. या बैठकीत संप तत्वत: मागे घेतल्याचं स्पष्ट झालं आहे. पुढील आठवड्यात एमएमआरटीएच्या बैठकीत भाडेवाढीवर अंतिम निर्णय होईल. त्यानंतर टॅक्सीच्या भाड्यात तीन रुपये तर रिक्षाच्या भाड्यात दोन रुपये वाढ केली जाईल. १ ऑक्टोबरपासून नवी भाडेवाढ लागू करण्याचे आश्वासन उदय सामंत यांनी दिलं आहे.

## शॉर्ट न्यूज »

### अदानी-अंबांनी यांच्यात 'नो पोचिंग' करार



।नवी दिल्ली। महाईन्यूज । प्रतिनिधी।

व्यावसायिक क्षेत्रात आता आणखी एक परदेशी संकल्पना भारतात रुजू होत आहे. गौतम अदानी आणि मुकेश अंबांनी यांनी नो पोचिंग ही संकल्पना भारतात आणली असून यासंदर्भात या दोन्ही कंपन्यांमध्ये महत्त्वपूर्ण करार झाला आहे. यानुसार,अदानी समूहाचे कर्मचारी रिलायन्स इंडस्ट्रीजमध्ये काम करू शकणार नाहीत. तसंच, मुकेश अंबांनी यांच्या रिलायन्स इंडस्ट्रीतील कर्मचारी अदानी समूहात काम करू शकणार नाहीत. या करारालाच नो पोचिंग असं म्हणतात.लेंट वॉर आणि पगारवाढीसाठी कर्मचारी सतत नोकऱ्या बदलत असतात. आपल्याच क्षेत्रात वारंवार नोकऱ्या बदलत गेल्याने चांगली हाईकसुद्धा मिळते. मात्र कंपन्यांना याचा तोटा होत असतो. कर्मचारी आपली कंपनी सोडून आपल्याच प्रतिस्पर्धी कंपनीत रुजू होते.

# अफगाणिस्तानच्या काबूलमध्ये पुन्हा मोठा बॉम्बस्फोट!

## 4 जणांचा मृत्यू, 10 जखमी

।तेहरान । महाईन्यूज । वृत्तसंस्था।

अफगाणिस्तानच्या काबूलमध्ये पुन्हा मोठा बॉम्बस्फोट झाला आहे. वजीर मोहम्मद अकबर खान ग्रँड मशिदीजवळ हा स्फोट झाला आहे. यात 4 जणं ठार झाले असून 10 जण जखमी झाल्याची माहिती समोर येत आहे. प्राथमिक माहितीनुसार, नमाज अदा केल्यानंतर लोक मशिदीतून बाहेर पडत असताना हा स्फोट झाला. या स्फोटामुळे आजूबाजूच्या परिसरात धुळ आणि धुराचे लोट पसरले होते, त्यामुळे नेमका हा स्फोट कोणत्या बाजूने झाला हे काही क्षण लोकांना समजवलेच नाही.



काबूल पोलिसांच्या माहितीनुसार, स्फोटात काही लोकं ठार झाले असून अनेक जण जखमी झाले आहे. काबूल गृहमंत्र्यांचे प्रवक्ते अब्दुल नफी तकोर यांनी सांगितले की, हा स्फोट मशिदीजवळ मुख्य रस्त्यावर झाला आहे. त्यामुळे स्फोटामागची कारणे तपासली जात आहेत. पोलिसांचे पथक घटनास्थळी असून प्रकरणाचा तपास सुरु आहे.

गेल्या काही महिन्यांत स्थानिक इस्लामिक स्टेट गटाने अफगाण शहराला लक्ष्य केल्याची अनेक प्रकरणे समोर आली आहेत. कालही काबूलमध्ये स्फोट झाला होता ज्यात तीन जण ठार तर 13 जण जखमी झाले होते. काबूल पोलिस प्रमुखांचे प्रवक्ते खालिद जद्रान यांनी सांगितले की, हा स्फोट शहराच्या पश्चिमेकडील देहमझाग येथील एका रेस्टॉरंटमध्ये झाला. स्फोटाचे कारण शोधण्यासाठी एक पथक परिसरात पोहोचले आहे.

या स्फोटात मृत्युमुखी पडलेल्यांमध्ये एका तरुणाचा समावेश आहे, जो परिसरातील एका फोटोग्राफीच्या दुकानात काम करत होता. या घटनेच्या काही तासांनंतर 21 सप्टेंबर रोजी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. स्फोटावेळी तेथे उपस्थित असलेल्या हमीद या व्यक्तीने सांगितले की, या घटनेत त्याचे तीन मित्र मारले गेले. हमीद म्हणाले, 'या घटनेत अनेक जण जखमी झाले आहेत. आम्ही अनेकांना कारमध्ये बसवले, त्यानंतर त्यांना इस्तेकलाल हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले.

---

# मुसळधार पावसामुळे दिल्ली-एनसीआरमधील रस्ते जलमय;

## नोएडातील शाळा बंद, गुडगावमधील कर्मचाऱ्यांना 'वर्क फ्रॉम होम'

।नवी दिल्ली ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

एनसीआरमध्ये झालेल्या मुसळधार पावसानंतर ठिकठिकाणी रस्त्यांवर पाणी साचले आहे. यामुळे दिल्लीकरांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. नोएडातील इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या शाळा आज बंद ठेवण्याचे आदेश प्रशासनाकडून देण्यात आले आहेत. तर गुडगावमधील खाजगी कार्यालयांमधील कर्मचाऱ्यांना 'वर्क फ्रॉम होम' करण्यास सांगण्यात आले आहे.



उत्तर प्रदेशातील काही भागांमध्ये गुरुवारी मुसळधार पाऊस कोसळला आहे. यामुळे काही ठिकाणी जीवितहानी झाल्याचे वृत्त आहे. दमदार पावसामुळे एनसीआरमधील काही मालमत्तांचे नुकसान झाले आहे. रस्ते जलमय झाल्यामुळे वाहतूक पोलिसांना वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी कसरत करावी लागत आहे. काही भागात झाडे उन्मळून पडल्याच्या घटनादेखील घडल्या आहेत. मान्सुन माघारी परतत असताना झालेल्या पावसामुळे दिल्ली-एनसीआरमधील ४६ टक्क्यांची पाण्याची तूट भरुन निघाली आहे. यामुळे दिल्लीकरांना स्वच्छ हवा अनुभवायला मिळत असून तापमान नियंत्रित राहण्यास मदत होत आहे. नवी दिल्लीत आज किमान तापमान २३.८ डिग्री सेल्सिअस तर कमाल तापमान २८ डिग्री सेल्सिअस नोंदवले गेले आहे.

# कोरोनाबाबत WHO चं विधान; महामारी अद्याप संपलेली नाही

।नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**अजून बराच पल्ला गाठायचाय**

कोरोना महामारीचे संकट अद्याप जगभरातून संपण्याचे नाव घेत नाही. मात्र गेल्या दोन वर्षांपेक्षा आता कोरोनाची परिस्थिती मोठ्या प्रमाणात नियंत्रणात आली आहे. गेल्या तीन वर्षातील कोरोना आकडेवारी आता घसरल्याचे पाहायला मिळत आहे. यात आता जागतिक आरोग्य संघटनेच्या प्रमुखांनी कोरोनाबाबत एक मोठ विधान केलं आहे. WHO प्रमुखांनी गुरुवारी कोविड-19 महामारीचा अंत जवळ आल्याचा त्यांचा दावा फेटाळून लावत म्हटले की, कोरोना संकटाचा अंत घोषित करण्यासाठी अजून खूप मोठा पल्ला गाठायचा आहे. मात्र गेल्या आठवड्यात WHO चे प्रमुख ट्रेड्रोस ॲधानोम गेब्रेयसस यांनी पत्रकारांशी बोलताना, जगभरातून कोरोना महामारी संपुष्टात आणण्यासाठी यापेक्षा चांगली स्थिती नसल्याचे म्हणत कोरोनाचा अंत जवळ आल्याचे दावा केला होता. मात्र



आज हा दावा त्यांनी फेटाळून लावला आहे.अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन यांनी रविवारी प्रसारित झालेल्या एका मुलाखतीत म्हटले होते की, युनायटेड स्टेट्समध्ये कोरोना महामारी संपुष्टात येत आहे. मात्र न्यूयॉर्कमध्ये संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेच्या बाजूला गुरुवारी पुन्हा मीडियाशी बोलताना ट्रेड्रोस यांनी कमी उत्साहित होत म्हटले की, कोरोनाचा अंत जवळ आला याचा अर्थ असा नाही की, कोरोना महामारी पुर्णपणे संपली आहे.

# ‘सीता रामम’ पाहून कंगनाला पडली मृणाल ठाकूरची भुरळ



बॉलिवूडची धाकड गर्ल अभिनेत्री कंगना रनौत वारंवार तिच्या वादग्रस्त वक्तव्यांमुळे चर्चेत असते. कंगना तिच्या सोशल मीडियावरून अनेक गोष्टींबाबत आपलं परखड मत मांडत असते. तसेच बॉलिवूडमधील अनेक दिग्गज अभिनेत्रींवर निशाणा साधत असते. दरम्यान, नुकतंच कंगनाने हिंदी टेलिव्हिजनपासून, बॉलिवूडमध्ये पदार्पण केलेल्या अभिनेत्री मृणाल ठाकूरच्या अभिनयाचे कौतुक केले आहे.

नुकत्याच काही दिवसांपूर्वी अभिनेत्री मृणाल ठाकूरचा ‘सीता रामम’ चित्रपट प्रदर्शित झाला होता. या चित्रपटात मृणालचा अभिनय अनेक प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला. पण फक्त मृणालचं कौतुक फक्त प्रेक्षकांनीच नाही तर अभिनेत्री कंगना रनौतने देखील केलं आहे. कंगनाने तिच्या इंस्टाग्राम अकाऊंटवर या चित्रपटाचं कौतुक करत एक स्टोरी शेअर केली आहे. यामध्ये कंगनाने लिहिलंय की, “या चित्रपटात सर्व कलाकारांनी छान काम केलं आहे. परंतु मला ज्या गोष्टीने आकर्षित केलं ती आहे मृणाल ठाकुरचा अभिनय कोणतीही अभिनेत्री इतक्या छान पद्धतीने राजकुमारी नूरजहा उर्फ सीता महालक्ष्मीची भूमिका साकारू शकत नव्हती. काय जबरदस्त कास्टिंग आहे. खरंच तू राणी आहेस. जिंदाबाद ठाकूर साहेब”. तसेच कंगनाने पुढच्या पोस्टमध्ये लिहिलंय की, शेवटी मला सीता रामम चित्रपट पाहण्याचा वेळ मिळाला. मी हे सांगू इच्छिते की हा खूप छान अनुभव आहे आणि खूप छान प्रेमकथा आहे. या चित्रपटाची गोष्ट आणि दिग्दर्शन खूपच सुंदर आहे. हनु राघवपुडी तुमचे खूप खूप अभिनंदन, डिपार्टमेंटच्या सर्व लोकांनी खूप छान काम केलं आहे. मृणाल ठाकूरचा हा पहिला तेलुगू चित्रपट आहे. या चित्रपटाला संपूर्ण देशातील प्रेक्षकांची पसंती मिळाली.

# ऐपत नाही तर...'! दीपिकाला आलं रडू

केवळ सर्वसामान्य माणसांनाच जीवेघेणे अनुभव येतात असे नाही. आपण ज्यांना नेहमीच चंदेरी दुनियात मनसोक्त मुशाफिरी करताना पाहतो अशा लाईमलाईटमधील लोकांना देखील तो त्रास झालेला असतो. वेगवेगळ्या समस्यांचा सामना करावा लागतो. टीव्ही मनोरंजन विश्वातील एका प्रसिद्ध अभिनेत्रीच्या वाट्याला लहानपणी जो विदारक अनुभव आला तो तिनं मुलाखतीच्या माध्यमातून प्रेभकांना सांगितला आहे. परिस्थिती हलाखीची असल्यास लोकं आपल्याला कशाप्रकारे पारखतात याचा तिनं वेगळा अनुभव यावेळी सांगितला आहे. दिया और बाती हम ही मालिका सध्याच्या घडीला प्रसिद्ध टीव्ही सीरियल आहे. त्याला मिळणारा प्रतिसादही मोठा आहे. या मालिकेतील कलाकार, त्यांचे प्रोफाईल सतत पाहण्याची सवय चाहत्यांना आहे.




# समांथा पुन्हा अडकणार लग्नबंधनात?

दाक्षिणात्य अभिनेत्री समांथा ही नेहमीच काही ना काही कारणांमुळे चर्चेत असते. ती नेहमीच विविध कारणांमुळे चर्चेत असल्याचे पाहायला मिळते. या सर्व चर्चा तिच्या खासगी आयुष्यामुळे जास्त प्रमाणात सुरु झाल्या. पती नागाचैतन्यला घटस्फोट दिल्यानंतर तिला अनेकदा ट्रोल करण्यात आलं. काही महिन्यांपूर्वी प्रदर्शित झालेल्या ‘पुष्पा’ चित्रपटातील ‘उ अंतावा उ उ अंतावा’ या आयटम साँगमुळे ती चर्चेत होती. आता मात्र समांथा एका वेगळ्याच कारणांमुळे चर्चेत आली आहे. नागाचैतन्यशी घटस्फोट झाल्यानंतर आता समांथाने आयुष्यात पुढे जाण्याचा निर्णय घेतला आहे.

समांथा ही सोशल मीडियावर प्रचंड सक्रीय असते. ती नेहमी विविध फोटो आणि व्हिडीओ पोस्ट करत चाहत्यांच्या संपर्कात राहण्याचा प्रयत्न करत असते. विशेष म्हणजे पती नागाचैतन्यसोबत घटस्फोट





झाल्यानंतरही ती सोशल मीडियावर फार सक्रीय झाली. विविध चित्रपट किंवा आगामी प्रोजेक्टबद्दल ती कायम पोस्ट करताना दिसते. त्यासोबतच ती तिच्या फिटनेसचे अनेक व्हिडीओदेखील शेअर करताना दिसते. नुकतंच समांथाने तिच्या पुढील आयुष्याबद्दल एक मोठा आणि महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.



# दीपा, अरुंधतीला मागे सारत 'ही' मालिका ठरली नंबर 1..

ओटीटीचे प्रस्थ कितीही वाढले तरी मालिकांची जादू काही कमी झालेली नाही. आजही चांदया पासून बांदयापर्यंत घराघरात मालिका पाहत जातात. सध्या मराठीमध्ये पाच वाहिन्या आणि पंचवीस हून अधिक मालिका असल्याने कोणती मालिका 'टीआरपी'च्या रेस मध्ये सर्वात वर आहे याकडे सर्वांचे लक्ष लागलेले असते. गेली काही महीने 'स्टार प्रवाह' वाहिनी यामध्ये सर्वात पुढे आहे तर गेली काही दिवस याच वाहिनीवरील 'रंग माझा वेगळा' ही मालिका सर्वाधिक टीआरपी मिळवणारी मालिका होती. पण यंदा मात्र या मालिकेला मागे सारून नवा विक्रम झाला आहे.टीआरपीच्या शर्यतीतही स्टार प्रवाह वरील 'रंग माझा वेगळा', 'आई कुठे काय करते', 'सुख म्हणजे नक्की काय असतं', 'फुलाला सुगंध मातीचा' आणि 'तुझेच मी गीत गात आहे' या मालिका टॉप 5मध्ये आहेत. 'रंग माझा वेगळा' ही मालिका अनेक महिने पहिल्या क्रमांकावर होती. शिवाय 'आई कुठे काय करते' या मालिकेचेही रेटिंग जास्त होते. पण या दोन्ही मालिकांना मागे सारून 'तुझेच मी गीत गात आहे' या मालिकेने यंदा पहिला नंबर पटकावला आहे.

# नेहा कक्करच्या आवाजातील ‘मैने पायल है छनकाई’ गाण्यावर प्रेक्षक संतापले

सुप्रसिद्ध गायिका नेहा कक्कर तिच्या सुंदर आवाज आणि मनमोहक गाण्यांमुळे ओळखली जाते. नेहा कक्करच्या आवाजाचे अनेक चाहते आहेत.

नेहा वारंवार तिच्या नवनवीन गाण्यांमुळे चर्चेत असते. तसेच नेहा सोशल मीडियावरही खूप चर्चेत असते. परंतु, सध्या नेहा कक्कर सोशल मीडिया आणखी एका कारणामुळे चर्चेत आली आहे. खरंतर नुकत्याच काही दिवसांपूर्वी नेहाने गायिका फाल्गुनी पाठक यांचं 90 च्या दशकातील सुप्रसिद्ध गाणं ‘मैने पायल है छनकाई’ गाणं आपल्या आवाजात रिक्रिएट केलं आहे.

काही जणांना हे गाणं खूप आवडलं आहे तर काही जणांनी या गाण्यामुळे नेहाला ट्रोल केलं आहे. या गाण्यामधील नेहाच्या आवाजाला लोक ट्रोल करू लागले आहेत. तसेच ते 90 च्या दशकातील फाल्गुनी पाठक ‘मैने पायल है छनकाई’ यांच्या सुंदर आवाजातील गाणं नेहा कक्करने रिक्रिएट करून खराब केलं आहे. त्यामुळे युजर्स नेहाला खूप ट्रोल करू लागले आहेत. नुकतचं नेहा कक्करच्या या गाण्याला टी-सीरीजने त्यांच्या ट्वीटर अकाऊंटवर शेअर केलं आहे. जे ऐकल्यानंतर अनेकजण तिला ट्रोल करू लागले आहेत. त्यांपैकी एका युजरने तर नेहावर त्याच्या लहानपणीच्या आवडत्या गाण्याला संपवण्याचा आरोप केला आहे. तर दुसऱ्याने रिक्रिएट गाण्याबाबत कमेंट केली की, मी गाण्यांचे रिमेक बनवणाऱ्यांच्या विरोधी आहे, जर श्रेया घोषालच्या आवाजामध्ये जसं एक दोन तीन गाण्याचं रिमेक बनवण्यात आलं. मात्र नेहा कक्करच्या आवाजातील या गाण्याने कानाचे पर्दे फाडत आहेत.

दरम्यान, या रिक्रिएट करण्यात आलेल्या या गाण्यामध्ये नेहा स्वतः परफॉर्म करताना दिसत आहे. सोबतच बिग बॉस फेम प्रियांक आणि धनश्री वर्मा सुद्धा दिसून येत आहेत. हे गाणं नेहाने तिच्या इंस्टाग्राम अकाऊंटवर पोस्ट देखील केलं आहे.



## शॉर्ट न्यूज »

### ‘बीसीसीआय’ची वार्षिक सर्वसाधारण सभा १८ ऑक्टोबरला



। मुंबई । महाईन्यूज

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाची (बीसीसीआय) वार्षिक सर्वसाधारण सभा १८ ऑक्टोबरला मुंबईत होणार आहे, अशी माहिती सचिव जय शहा यांनी दिली. या सभेच्या कार्यक्रमपत्रिकेत महिला इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) हा एक महत्त्वाचा विषय असेल. याचप्रमाणे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, संयुक्त सचिव आणि कोषाध्यक्ष या पदांसाठी निवडणूक होणार आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेवरील (आयसीसी) भारताचा प्रतिनिधीसुद्धा याच सभेत निवडणुकीद्वारे ठरणार आहे. अध्यक्षपदासाठी ७७ वर्षीय क्रिकेट संघटक एन. श्रीनिवासन ५० वर्षीय विद्यमान अध्यक्ष सौरव गांगुलीला आव्हान देण्याची दाट शक्यता आहे. एकंदर २९ मुद्द्यांचा कार्यक्रमपत्रिकेत समावेश करण्यात आला आहे, असे राज्य संघटनांना ‘बीसीसीआय’ने पाठवलेल्या पत्रात म्हटले आहे.

भारत-ऑस्ट्रेलिया ट्वेन्टी-20 मालिका

# बुमराबाबत संभ्रम कायम!

## दुसऱ्या सामन्यात विजयी पुनरागमनाचे भारताचे लक्ष्य



।नागपूर । महाईन्यूज ।

प्रमुख वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराच्या तंदुरुस्तीबाबत संभ्रम कायम असून शुक्रवारी ऑस्ट्रेलियाविरुद्ध दुसऱ्या ट्वेन्टी-२० क्रिकेट सामन्यात त्याच्या उपलब्धतेची भारतीय संघाला आशा आहे. पहिल्या सामन्यात पराभव पत्करावा लागल्यामुळे तीन सामन्यांच्या मालिकेतील आव्हान कायम राखण्यासाठी भारताने दुसऱ्या सामन्यात विजयी पुनरागमन करणे गरजेचे आहे. हा सामना नागपूरच्या विदर्भ क्रिकेट संघटनेच्या स्टेडियमवर रंगणार आहे.

बुमराला गेल्या काही काळापासून दुखापतींनी सतावले आहे. पाठीच्या दुखापतीमुळे त्याला या महिन्यात झालेल्या आशिया चषक स्पर्धेला मुकावे लागले होते. त्याने बंगळूरु येथील राष्ट्रीय क्रिकेट अकादमीत या दुखापतीवर उपचार घेतले. त्यानंतर ‘बीसीसीआय’च्या वैद्यकीत पथकाने त्याला तंदुरुस्त ठरवल्यामुळे ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेसाठी त्याची भारतीय संघात निवड झाली. मात्र, मोहाली येथे झालेल्या पहिल्या ट्वेन्टी-२० सामन्यात त्याला अंतिम ११ खेळाडूंमध्ये स्थान न मिळाल्याचे सर्वानाच आश्चर्य वाटले. त्यामुळे त्याच्या तंदुरुस्तीबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

### गोलंदाजीची चिंता

भारतीय संघाला सध्या गोलंदाजीची चिंता आहे. पहिल्या सामन्यात २०८ धावांची मजल मारल्यानंतरही भारतीय संघाला पराभव पत्करावा लागला. भुवनेश्वर कुमार (चार षटकांत ५२ धावा) आणि हर्षल पटेल (चार षटकांत ४९ धावा) हे प्रमुख वेगवान गोलंदाज अपयशी ठरले. तसेच लेग-स्पिनर यजुर्वेद्र चहलने एक बळी मिळवला, पण त्यासाठी ४२ धावा दिल्या. केवळ अक्षर पटेलला (३/१७) प्रभावी मारा करता आला. त्यामुळे दुसऱ्या सामन्यात बुमरासह रविचंद्रन अश्विनचे भारतीय संघात पुनरागमन होऊ शकेल. फलंदाजीची भिस्त पहिल्या सामन्यातील अर्धशतकवीर केएल राहुल, कर्णधार रोहित शर्मा, विराट कोहली आणि सूर्यकुमार यादव यांच्यावर असेल. अष्टपैलू हार्दिक पंड्याने पहिल्या सामन्यात अर्धशतक झळकावत सर्वानाच प्रभावित केले.मात्र, त्याच्या गोलंदाजीत सुधारणेला वाव आहे.

### सामन्यावर पावसाचे सावट!

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील नागपूर येथे होणाऱ्या दुसऱ्या ट्वेन्टी-२० क्रिकेट सामन्यावर पावसाचे सावट आहे. गेल्या काही दिवसांपासून नागपूरमध्ये संततधार सुरू असून शुक्रवारीही पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. या सामन्यासाठी सर्व ४५ हजार तिकिटांची विक्री झाली आहे.

# फेडररने टेनिस जगतात वेगळे वलय निर्माण केले!

## माजी खेळाडू गौरव नाटेकर यांच्याकडून स्तुती





। मुंबई । महाईन्यूज ।

रॉजर फेडररने आपल्या खेळामुळे वेगळे वलय निर्माण केले आहे. त्याच्या कारकीर्दीत अनेक जण टेनिसकडे आकर्षित झाले, असे भारताचे माजी टेनिसपटू गौरव नाटेकर यांनी सांगितले. फेडररची खेळण्याची शैली, प्रतिस्पर्धी खेळाडूंबद्दल असलेला त्याचा आदर आणि आपल्या संघासाठीची भावना आपण फार कमी खेळाडूंमध्ये पाहतो. माझ्या दृष्टीने तो महान खेळाडू असला तरीही नदाल आणि जोकोव्हिचला विसरून चालणार नाही, असे नाटेकर यांनी सांगितले. फेडररने निवृत्तीची घाई केली, या प्रश्नावर नाटेकर म्हणाले, “निवृत्ती घेण्याची योग्य अशी कोणतीच वेळ नसते. अनेक रात्र मी झोपलो नाही, असे फेडरर म्हणाला होता. लेव्हर चषकाची संकल्पना ही स्वत: फेडररचीच आहे. ही स्पर्धा ‘एटीपी’ कार्यक्रमाचाही भाग आहे. त्यामुळे या स्पर्धेत निवृत्ती घेण्याचा त्याने विचार केला असेल. गेल्या वर्षी तो दुखापतीतून सावरत होता. वयाच्या ४१व्या वर्षी पाच सेटचे सामने खेळणे, हे त्याच्यासाठी कठीण गेले असते.” लेव्हर चषक स्पर्धेचे थेट प्रक्षेपण सोनी टेन १ वाहिनीवर करण्यात येणार आहे.

फेडररनंतर आगामी काळात कोणते खेळाडू हे लक्षवेधक कामगिरी करू शकतात यावर नाटेकर यांनी सांगितले की, “गेल्या दोन-तीन वर्षांत अनेक जणांनी मला हा प्रश्न विचारला आहे.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही